## नि.दि.दावा क्र.०५/२०१८ मधील नि.५ वरील आदेश

CNR NO.MHTH170000732018

सौ. विजया विश्वनाथ पाटील व १ ... वादी

विरुद्ध

मे. नेस्ट इन्फ्रा भागीदारी पेढी व इतर ... प्रतिवादी

..........

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींविरुद्ध दावा मिळकतीवरील वादींच्या कब्जास दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत प्रतिवादींनी स्वत: अगर त्यांच्यातर्फे इतर कोणीही हरकत, अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादींनी या अर्जास नि.११ व नि २४ येथे म्हणणे देवून वादींच्या अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत व वादीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद, वादीचा अर्ज, त्यावरील प्रतिवादींचे म्हणणे व त्यासोबतची कागदपत्रे पाहता खालील मुद्दे विचाराधीन झाले आहेत. त्यांचे निष्कर्ष व कारणमिमांसा खालीलप्रमाणे :

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| (१) | वादींनी सकृतदर्शनी केस शाबित केली आहे काय ? | ... | नाही. |
| (२) | न्यायाचा तराजु वादींच्या बाजुने आहे काय? | ... | नाही. |
| (३) | वादींचा अर्ज नामंजुर केल्यास वादींचे अतोनात नुकसान होईल का? | ... | नाही. |
| (४) | काय आदेश ? | ... | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## —: कारणमिमांसा :—

**मुद्दे क्र.१ ते ३ साठी:**

४. वादींच्या अर्जातील कथने पाहता, मौजे टेंभोडे, तालुका व जिल्हा पालघर येथे खालील वर्णनाची जमिन आहे.

| सर्वे क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|
| ६ | ३/१ | ०—२०—५०<br>०—०३—१०<br>०—२३—६० |

वर वर्णन केलेल्या जमिनीपैकी दाव्यासोबतच्या नकाशात लाल रंगाने दाखवलेली सुमारे ०—११—० हे.आर. जमिन ही या दाव्याचा विषय असून तिला दाव्यात यापुढे 'दावा मिळकत' असे संबोधण्यात आले आहे. ज्याच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे—

पूर्वेस : सर्वे क्र.६/३/२ ची जमिन.

पश्चिमेस : सर्वे क्र.६/१अ ची जमिन.

दक्षिणेस : सर्वे क्र.६/३/१ ची उर्वरित जमिन.

उत्तरेस : सर्वे क्र.६/२ ची जमिन.

वर वर्णन केलेली दावा मिळकत ही वादी क्र.१ च्या कब्जात वाडवडीलांपासून आहे. दावा मिळकत वादी क्र.१ चे आजोबा महादू जैतू पाटील, त्यानंतर वादी क्र.१ वडील देवजी महादू पाटील व आई देवकीबाई देवजी पाटील यांच्या कब्जात लागवडीखाली होती. त्यांच्यापश्चात दावा मिळकत ही वादींच्या प्रत्यक्ष कब्जात लागवडीखाली आहेत. दावा मिळकत ही प्रत्यक्ष वादींच्या कब्जात आहे याची माहिती प्रतिवादींना पूर्वीपासून होती व आहे.

५. वादींचे पुढे असेही म्हणणे आहे की, दावा मिळकत व त्याच्या

पश्चिमेला असलेली सर्वे क्र.६/१अ ची जमिन वादी क्र.१ ची वडीलापार्जीत जमिन मिळकत हया मिळकती एकमेकांनी लागून असून त्या एकाच कुंपणात आहेत. त्यामध्ये वादी हे दरवर्षी पावसाळी भात व उन्हाळी भाजीपाल्याचे पिक घेत आलेले आहेत. सदर दावा मिळकतीत वादींनी मजुरांसाठी झोपडे देखील बांधले असून त्यांत दावा मिळकतीत काम करणारे मजूर वास्तव्य करतात. दावा मिळकत व सर्वे क्र.६/१अ च्या एकत्रित जमिनीमध्ये जाणे—येणे, गाडी नेणे—आणणेकामी दावा मिळकतीच्या दक्षिणेकडून वाडवडीलांपासून वादींना स्मरत नाही, त्यापूर्वीपासून दक्षिण—उत्तर असा रस्ता आहे. तो रस्ता सर्वे क्र. ११४/ब व उर्वरित दक्षिणेकडील सर्वे क्र.६/३/१ चे जमिनीमधून दावा मिळकतीमध्ये येतो. त्या रस्त्याशिवाय वादींस दावा मिळकत व सर्वे क्र. ६/१अ च्या जमिनीमध्ये जाणे—येणे, गाडी नेणे—आणणेकामी अन्य कोणताही रस्ता नाही.

६. वादींचे पुढे असेही म्हणणे आहे की, दावा मिळकतीच्या उत्तरेकडील सर्वे क्र.६/२ व ६/५ ची जमिन ही प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी प्रतिवादी क्र.१ हया भागीदारी पेढीचे नावे विकसीत करण्यास घेतली. सदरहु सर्वे क्र.६/२ व ६/५ च्या जमिनीत जाणे—येणे, गाडी ने—आण करण्यासाठी सदर जमिनीच्या उत्तरेस स्वतंत्र रस्ता आहे. प्रतिवादींनी सदर जमिन विकसीत करताना लागणारे मालसामान देखील प्रतिवादींनी सर्वे क्र.६/२ व ६/५ चे उत्तरेकडील उपलब्ध रस्त्यावरुन वाहून आणले. प्रतिवादींनी सर्वे क्र.६/२ व ६/५ मध्ये इमारतीचे बहुतांश काम पुर्ण केल्यानंतर सुमारे डिसेंबर २०१७ चे सुरुवातीस रात्रीचे वेळी दावा मिळकतीमध्ये खडी व वीटा आणून टाकल्या, तसेच दावा मिळकतीचे असलेले दक्षिण हद्दीवरील कंपाउंड व लाकडी झापा देखील प्रतिवादींनी रातोरात तोडून टाकले व दावा मिळकतीत मुरुम टाकून त्यामधील वादींनी लावलेली झाडे व पिकांचे नुकसान केले. त्याचवेळी दावा मिळकतीमध्ये वादीने त्याचे शेतमजुरांना राहण्यासाठी बांधलेले झोपडे देखील

त्यादिवशी शेतमजूर नसल्याचे पाहून तोडले व नासधूस केली व यामधील मालसामान बाहेर फेकून दिले. वादींनी त्याबाबत प्रतिवादींस जाब विचारला असता, प्रतिवादी दावा मिळकत ही ७/१२ सदरी दिसत असलेल्या अनंत यादव पाटील व घन:शाम यादव पाटील यांच्याकडून नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी केल्याचे सांगून दावा मिळकतीमध्ये वादींना न येण्याची धमकी दिली. वर नमुद प्रतिवादींचे कृत्य हे बेकायदेशीर असून वादींचा दावा मिळकतीवरील कब्जा व बळाचा वापर करुन घेण्याचा प्रतिवादींचा प्रयत्न आहे. प्रतिवादी हा बळाचा व पैशाचा वापर करुन वादींस कोणत्याही क्षणी दावा मिळकतीतून बेदखल करण्याची प्रामाणिक भिती वादींस वाटत आहे. तसेच दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींनी अतिक्रमण करुन वादींस दावा मिळकतीमधून बेदखल केल्यास वादींचे भविष्यात कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. तसेच वादीच्या मालकीच्या सर्वे क्र.६/१अ हया जमिनीमध्ये जाण्यायेण्याचा रस्ताही बंद होईल आणि वादींस त्यांच्या मालकीच्या जमिनीचा उपभोग घेता येणार नाही. शेती करता येणार नाही. सबब वादींनी प्रतिवादीविरुद्ध कायमचे मनाईहुकूमाकामी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे असे कथन करुन या अर्जाद्वारे प्रतिवादीविरुद्ध तात्पुरता मनाई हुकूम मागीतला आहे.

७. प्रतिवादींनी त्यांच्या नि.११ व नि.२४ येथील म्हणण्यात वादींची कथने नाकारली आहेत. प्रतिवादींच्या कथनानुसार दावा मिळकत सर्वे क्र. ६/३/१ ची जमिन बिनशेती असून, प्रतिवादी क्र.१ चे भागीदार विनय नरेश जैन व चेतन अनंतराय दोशी यांच्या मालकीची व कब्जेवहिवाटीची आहे. मौजे टेंभोडे सर्वे क्र.६/३/१, क्षेत्र ०—२३—६० हे.आर. या जमिनीसह अन्य जमिनींची वाटणी अनंत यादव पाटील व घन:शाम यादव पाटील यांनी दिनांक २०/०२/२०१३ रोजीच्या नोंदणीकृत वाटणीपत्र दस्त क्र.१५७२/२०१३ अन्वये करुन घेतली होती. दावा मिळकत प्रतिवादी क्र.१ च्या भागीदारांनी श्री. घन:शाम यादव पाटील यांच्याकडून व अनंत यादव पाटील यांच्या संमत्तीने

दिनांक ३०/१२/२०१४ रोजीच्या नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्र. ३४१४/२०१४ अन्वये भर मोबदला देवून खरेदी केली आहे.

८. प्रतिवादींचे पुढे असेही म्हणणे आहे की, प्रतिवादींनी खरेदी केलेल्या मौजे. टेंभोडे, तालुका पालघर येथील सर्वे क्र.५/३ पैकी ६/२, ६/३ पैकी, क्षेत्र ५५८५ चौरस मिटर जागेवर बांधकाम करण्यासाठी पालघर नगरपरिषदेने दिनांक ०९/०६/२०१६ रोजी परवानगी दिल्याने प्रतिवादींनी बांधकाम सुरु करण्यापूर्वी ॲड. लेरॉय एस. लोबो मार्फत दावा मिळकतीच्या पुर्ण क्षेत्राबाबत टायटल सर्चचा भाग म्हणून तमाम जनतेकडून हरकत मागवण्याबाबत दिनांक १०/०६/२०१६ रोजीची जाहीर नोटीस वर्तमानपत्रात प्रसिद्ध केली होती. त्यास वादींसह अन्य कोणीही कुठल्याही प्रकारे हरकत घेतली नव्हती. तसेच ॲड. लेरॉय एस. लोबो यांनी दावा मिळकतीबाबत सर्च घेवून टायटल क्लीअर असल्याबाबतचा दाखला दिनांक २३/०९/२०१६ रोजी दिला आहे.

९. प्रतिवादींचे पुढे असेही म्हणणे आहे की, मौजे टेंभोडे, तालुका पालघर येथील सर्वे क्र.६/१/अ/१ या जमिनीच्या ७/१२ सदरी देवकीबाई देवजी पाटील यांचे नाव आहे. देवकीबाई फार पूर्वी मयत झाल्याचे समजते. वादी क्र.१ ही मयत देवकीबाईचे पहिले पती दाजी वझे यांची मुलगी असल्याने, वादी क्र.१ देवकीबाईचे दुसरे पती देवजी पाटील यांचे कायद्याने वारस होवू शकत नाही आणि म्हणूनच सर्वे क्र.६/१/अ/१ च्या ७/१२ सदरी चुकीच्या पद्धतीने देवकीबाई देवजी पाटीलच्या नावाची नोंद झाल्यानंतर त्यांच्या मृत्यूनंतर वादी क्र.१ च्या नावाची नोंद झालेली नाही. प्रतिवादींचे पुढे असेही म्हणणे आहे की, हरेश्वर उर्फ हरिश्चंद्र देवजी पाटील हे वादी क्र.१ चे सख्खे मोठे भाऊ नाही. हरिश्चंद्र हे देवजी पाटील यांची पहिली पत्नी व्दारकाबाईकडून झालेला मुलगा असून वादी क्र.१ ही देवकीबाईला तिचे

पहिले पती दाजी वझे यांच्याकडून झालेली मुलगी असल्याने, तसेच हरिश्चंद्र व वादी क्र.१ यांच्यामध्ये दिवाणी व महसूली स्वरुपाचा वाद असल्याने व त्या वादामध्ये हरिश्चंद्रने वादी क्र.१ ही एकत्र कुटुंबाची सदस्य असल्याचे नाकारल्याने, सर्वे क्र.६/३/२ च्या पश्चिम चतु:सिमेत हरिश्चंद्र देवजी पाटील यांचे नाव असल्याने, त्याआधारे दावा मिळकतीवर हक्क सांगण्याचा वादींना अधिकार नाही.

१०. प्रतिवादींचे पुढे असेही म्हणणे आहे की, वादी क्र.१ हिने हरिश्चंद्र देवजी पाटील व इतरांविरुद्ध पालघर येथील दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, यांचे कोर्टात वि.मु.क्र.३३/२०१२ वाटपासाठी, कब्जासाठी व अन्य मागण्यासाठी दाखल केला आहे व तो आजही न्यायप्रविष्ट आहे. प्रस्तुत दाव्यातील मौजे टेंभोडे, तालुका पालघर येथील सर्वे क्र.६, हिस्सा क्र.३/१ पैकी ०—११—० हे.आर. जमिन दावा परि.क्र.२ प्रमाणे जर खरोखर वादी क्र.१ च्या कब्जात वाड—वडीलांपासून असती तर या दावा मिळकतीचा समावेश अगर उल्लेख वि.मु.क्र.३३/२०१२ मध्ये वादी क्र.१ ने केला असता. परंतु प्रस्तुत दाव्यामध्ये नमुद केलेली वस्तुस्थिती खरी नसल्याने या दाव्यातील बाबींचा उल्लेख वादी क्र.१ यांनी अगोदर दाखल केलेल्या वि.मु.क्र. ३३/२०१२ मध्ये नाही. यावरुन दिसून येते की, वादींनी प्रतिवादींना त्रास देण्यासाठी व पैसे उकळण्यासाठी प्रस्तुतचा खोटा व चुकीचा दावा दाखल केला आहे. अशाप्रकारे टेंभोडे गावाच्या डांबरी रस्त्यावरुन, पुढे दावा मिळकतीतून जाणाऱ्या प्रतिवादींच्या खाजगी मालकीच्या पेव्हर ब्लॉकच्या रस्त्याशी व दावा मिळकतीशी वादींचा कोणताही संबंध नाही. या रस्त्याशिवाय प्रतिवादींना दुसरा रस्ता नाही. सबब वादींनी प्रतिवादीविरुद्ध खोटा, चुकीचा व द्वेषमुलक दावा दिला आहे.

११. वरिल दोन्ही कथन पाहता व वादीने दाव्यासोबत नि.३ सोबत

दाखल केलेली कागदपत्रे पाहता, वादीने नि.३/१ वर सर्वे क्र.६/३/१ चा ७/१२ उतारा दाखल केला असून त्यामध्ये भोगवटदार म्हणून घन:शाम यादव पाटील यांच्यानंतर चेतन अनंतराय दोशी व मे. नेस्ट इन्फ्रातर्फे भागीदार विनय नरेश जैन यांच्या नावाची नोंद दिसून येते. नि.३/२ वर गट क्र.६/१/अ/१ चे ७/१२ असून त्यामध्ये भोगवटदार म्हणून देवकीबाई देवजी पाटील यांचा उल्लेख आहे. वादीने दाखल केलेल्या कोणत्याही कागदपत्रांमध्ये वादीचे नाव दावा मिळकतीत असल्याबाबत अथवा वादीचे कथनाप्रमाणे हरिश्चंद्र देवजी पाटील यांची ही दावा मिळकत असल्याचे दाखवणारा कोणताही कागदोपत्री पुरावा वादीने दिलेला नाही. याउलट ज्या हरिश्चंद्र देवजी पाटील यांची ही मिळकत आहे असे वादीचे कथन आहे त्या हरिश्चंद्र देवजी पाटील यांना याकामी वादीने पक्षकार केले नाही अथवा त्याचे प्रतिज्ञापत्र या अर्जाचे पुष्ठर्थ दाखल केले नाही. जेणेकरुन ही दावा मिळकत वादीच्या कब्जात आहे असे म्हणता येईल.

१२. याउलट प्रतिवादी क्र.१ ने दाखल केलेली नि.१३ येथील कागदपत्रे पाहता, वादी क्र.१ यांनी पालघर येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर यांचे कोर्टात दाखल केलेल्या वि.मु.क्र.३३/२०१२ चे दाव्याची प्रत पाहता, वादीने हा दावा श्री. हरिश्चंद्र देवजी पाटील व इतरांविरुद्ध दावा जाहिर हुकूम मिळण्यासाठी व वादीचा त्या दाव्यातील मिळकतीमधील ५/१२ हिस्सा ताब्यात मिळण्यासाठी केलेला दिसून येतो. त्या दाव्यातील मिळकती पाहता, त्यामध्ये कुठेही वादीने प्रस्तुत अर्जातील मिळकत म्हणजेच गट क्र.६/३/१ चा उल्लेख केलेला दिसत नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादीने नि.१३/२ येथे दाखल केलेले वाटणीपत्र पाहता, सदरचे वाटणीपत्र हे अनंत यादव पाटील व घन:शाम यादव पाटील यांच्यामध्ये झालेले होते व त्याप्रमाणे गट क्र. ६/३/१ ही जमीन या दोघांचे वडील कै. यादव लक्ष्मण पाटील यांच्याकडे होती व त्यांच्यापश्चात सदरची जमिन ही अनंत यादव पाटील व घन:शाम

यादव पाटील यांनी वरील वाटणीपत्रानुसार इतर जमिनींसोबत एकमेकांत वाटप करुन घेतली होती असे दिसून येते. नि.१३/३ सोबतचे पलर ३४१३/२०१४ चे खरेदीखत पाहता, गट क्र.६/३/१ पैकी ०—११—० हे.आर. म्हणजेच दावा मिळकत ही घन:शाम यादव पाटील यांनी अनंत यादव पाटील यांचे संमत्तीने, प्रतिवादी क्र.१ म्हणजेच मे. नेस्ट इन्फ्रातर्फे भागीदार विनय नरेश जैन व चेतन अनंतराय दोशी यांनी विक्री केलेली दिसून येते.

१३. वादीने त्यांच्या दाव्यात तसेच प्रस्तुतच्या अर्जात कोठेही त्यांची वंशावळ दिलेली नाही व दावा मिळकत ही त्यांच्या कब्जात कशी व कोणाकडून आली हे स्पष्ट केलले नाही. याउलट प्रतिवादीने दिलेल्या वरिल कागदपत्रांवरुन दावा मिळकत ही अनंत व घन:शाम यादव पाटील यांच्या वडीलांच्या हिश्श्यात व त्यांच्यापश्चात त्यांच्या हिश्श्यात आली होती हीच बाब स्पष्ट होते. त्यामुळे दावा मिळकतीशी वादीला संबंधाबाबत व कब्जाबाबतची बाब सकृतदर्शनी शाबित झालेली नाही. याउलट प्रतिवादी हेच दावा मिळकतीचे मालक असल्याबाबत व त्याप्रमाणे ती प्रतिवादींच्याच मालकी व कब्जेवहिवाटीत असल्याबाबत सकृतदर्शनी शाबित होते. सबब न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने नाही व सदरचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे अतोनात नुकसान होण्याची शक्यता आहे. सबब, मी मुद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देवून खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१) अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२) खर्चाबाबत आदेश मूळ दाव्यात करण्यात येतील.

स्वाक्षरी/—
(एन. बी. घाटगे)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
पालघर. (न्यायालय क्र.१)

पालघर.
दिनांक : ३०/११/२०१८